महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे
Epaper: www.dainiklokneta.in/
दैनिक लोकनेता
दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.
मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112
dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

शुक्रवार दि.२७ मार्च २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ अंक : २२३ | किंमत २ रुपये | 7499615933

# पाचोडच्या शिवछत्रपती महाविद्यालयात पक्षिसंवर्धन, चिमण्यांसाठी अन्न-पाण्याची सोय

## जागतिक चिमणी दिनानिमित्त प्राचार्य व शिक्षकांचापुढाकार

## महाविद्यालयाच्या आवारात धान्यासह पाण्याची व्यवस्था

### मनुष्याच्या जवळीकता असणारे चिमण्यांची ओळख..

**माणसाच्या अगदी जवळच राहणारा हा पक्षी म्हणून आपण चिमणीला ओळखतो. पण सध्या शहरात ही चिमणी कमी झाल्याचे दिसून येत आहे. या चिमण्यांची संख्या वाढवायची, तर त्यांना आसरा, अन्न, पाणी देणे आवश्यक आहे.२० मार्च हा दिवस दरवर्षी जागतिक चिमणी दिन म्हणून पाळला जात आहे. हा दिवस त्यांच्या संख्येबद्दल लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी साजरा केला जातो. चिमणी कीटक, धान्य, ज्वारी, तांदूळ, शिजवलेले अन्न असे सर्व प्रकारचे खाद्य खाते. गवत, कापूस, पिसे, मिळतील त्या वस्तू वापरून चिमणी घराचे छत, वळचणीच्या जागा, दिव्यांच्या मागे, झाडांवर असे कुठेही घरटे बांधते.**



लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

मोबाईल क्रांतीच्या आधुनिकीरणाच्या जमान्यात उभारण्यात आलेल्या मोठमोठ टॉवर हे चिमण्यासह इतर पक्ष्यांना देखील जीवघेणे ठरत असल्याने दिवसेंदिवस चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत असल्याने त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. चिमण्यांचे संवर्धन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न अनेक पक्षी मित्रांनी केले पाहिजे . त्यातून थोडेसे का होईना यश आले. चिमण्यांचे अस्तित्व टिकविण्यासाठी असाच प्रयत्न पाचोड ता.पैठण येथील शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावले व त्यांच्या सहकारी शिक्षकांनी केला आहे.

महाविद्यालयातील प्राचार्य अन शाळेतील शिक्षकांनी कॉलेजच्या मैदानात चिमण्यांसाठी चारा, पाण्याची व्यवस्था केली.दररोज नित्यनेमाणे चिमण्यांसाठी पाणी धान्य अन् इतर चारा कॉलेजच्या मैदानातील झाडाच्या फांद्यासह ओटयावर मातीच्या भांडयात टाकतात.त्यामुळे येथे अन्न आणि पाण्याच्या उपलब्धतेमुळे चिमण्यांची चिवचिव परिसरात घुमत असल्याने विद्यार्थ्यांबरोबर चिमण्यांचीही शाळा भरत असल्याचे अनोखे चित्र दिसते.यावेळी पाचोड सर्कल प्रतिनिधी श्री त्रिसिंग जायभाये उपस्थित होते.प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे सर यांनी त्यांचा सत्कार केला.पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयाचे उपक्रमशील प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावले उपप्राचार्य यादव प्रा बिडवे.प्रा कांबळे, प्रा.इंगळे,प्रा.पोटभरे, प्रा.जैन,वाघआदी शिक्षकांनी २० मार्च रोजीच्या जागतिक चिमणी दिवसाच्या निमित्ताने कॉलेजच्या गार्डनातील झाडांच्या फांद्यांना ठिकठिकाणी मातीच्या मडके बांधून त्यात बाजरी तांदूळ ज्वारीसह पाणी टाकतात.त्यामुळे कडक उन्हाळ्यात अन्न पाणीच्या शोधात भंटकंती करणाऱ्या चिमण्यासह इतर लहान मोठ्या पक्ष्यांना हक्काचे निवारासह खाण्यापिन्याचे असलेले ठिकाणी मिळाल्याने या ठिकाणी दररोज चिमण्यासह इतर पक्ष्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसते.

तसेच ग्रामपंचायतीकडून पाण्याची व्यवस्था झाल्याने झाडांना पाणी उपलब्ध झाले. यामुळे पाच वर्षात परिसर उंच वाढलेल्या झाडांनी कॉलेजला वेढा घातला. सर्वत्र हिरवीगार झाडे दिसत आहे. वृक्षांच्या भरभराटीमुळे चिमण्यांसह इतर पक्ष्यांची वर्दळ वाढली. पक्ष्यांची पाणी व चार्याच्या शोधार्थ होणारी वणवण थांबविण्यासाठी कॉलेजच्या परिसरात पाणी व अन्नधान्याची सोय केली. शिक्षक चिमण्यांसाठी बाजरी खरेदी करून आणतात. त्यामुळे मैदानात असलेल्या ओट्यावर धान्य टाकल्याने चिमण्यांचे थवे या ओट्यावर येतात. चिमण्यांची चिवचिव मात्र परिसरात ऐकू येते असल्याने मनाला प्रसन्न वाटते.

### चिमण्यांनो परत फिरा रे.....

**पाणी व चार्यासाठी पक्षांची होणारी कासावीस पाहून पक्षांसाठी घोटभर पाणी अन् मूठभर धान्य हा उपक्रम राबविला. चिमण्यांचे अस्तित्व धोक्यात असल्याने चिमण्यांचे संवर्धन करण्याचा निर्णय घेतला. कॉलेजने हा उपक्रम राबविल्याने तो यशस्वी झाला. 'चिमण्यांनो परत फिरा रे' हा उद्देश सफल झाला.**

**-डॉ.चंद्रसेन कोठावळे**

**प्रत्येकाने आपल्या घराशेजारी चिमण्यांसाठी आसरा, अन्न आणि पाण्याची सोय करून ठेवली पाहिजे; तरच त्यांची संख्या वाढेल. सकाळी चिमण्यांचा चिवचिवाट ऐकायला खूप छान वाटते. त्यामुळे असा आवाज ऐकणे हा एक अविस्मरणीय अनुभव असतो. त्यासाठी आम्ही आमच्या घराशेजारीच मातीच्या भांड्यात पाणी आणि सभोवती अन्न ठेवतो. आज चिमण्यांसोबतच अनेक पक्षी येथे येत आहेत.**

# खरवंडी कासारमध्ये रामनवमी उत्साहात साजरी रक्तदान व नेत्रतपासणी शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद





लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथे श्रीरामनवमीचा उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात व सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. श्रीराम जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रक्तदान शिबिर व मोफत नेत्रतपासणी शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. उपस्थित भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने पूजा-अर्चा करून श्रीरामांचे दर्शन घेतले. यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व सकल हिंदू समाज, खरवंडी परिसर यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत स्वेच्छेने रक्तदान केले. तसेच नेत्रतपासणी शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी करण्यात आली व मोतीबिंदू रुग्णांसाठी पुढील उपचारांची नोंदणी करण्यात आली.

कार्यक्रमात तुळजवाडी संस्थांचे महंत खताळ महाराज यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, रामनवमी हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजाला एकजूट, सेवा आणि संस्कार यांचा संदेश देणारा दिवस आहे. युवकांनी संघटित राहून समाजकार्य करत धर्मरक्षणासाठी पुढे यावे. त्यांच्या मार्गदर्शनाने उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

या प्रसंगी भगवानगड परिसरातील असंख्य हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध नियोजन करत शिबिर यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. रक्तदात्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला तसेच स्वयंसेवक व वैद्यकीय पथकासाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

याचबरोबर रामनवमी निमित्त गावातून भव्य शोभायात्राही काढण्यात आली. भगव्या पताकांनी सजलेली ही शोभायात्रा वाजतगाजत निघाली असून रामभक्तांनी जयघोष करत वातावरण भक्तिमय केले. सर्वांच्या सहकार्यामुळे धार्मिक उत्सवासोबतच सामाजिक उपक्रमाचा आदर्श निर्माण करत खरवंडी कासार गावाने पुन्हा एकदा समाजापुढे प्रेरणादायी उदाहरण ठेवले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# औसा शहरासह तालुक्यात श्री राम जन्मोत्सव उत्साहात साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**औसा । महेश कोळी**



चैत्रशुद्ध नवमीचा दिवस हा मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र यांच्या जयंतीचा उत्सव श्रीराम भक्त अत्यंत हर्ष उल्हास आणि प्रतिवर्षी श्रीराम नवमी म्हणून साजरा करतात औसा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात श्रीराम भक्तांनी श्रीराम जन्मोत्सवाचा सोहळा अत्यंत उत्साहात साजरा केला शहरातील भुईकोट किल्ल्या नजीक असलेल्या श्रीराम मंदिरामध्ये मंदिर समिती व श्रीराम जन्मोत्सव संयोजन समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता सकाळी दहा वाजल्यापासूनच भजन व श्रीराम जन्माचा पाळणा तसेच दुपारी बारा वाजता गुलाल उधळून श्रीराम जय राम जय जय राम चा जयघोष करीत श्रीराम नवमी चा उत्सव रामभक्त आणि साजरा केला औसा लातूर रस्त्यावर हनुमंत थोरात यांच्या शेतातील मंदिरातही श्रीराम नवमीचा उत्सव साजरा करण्यात आला तालुक्यातील बेलकुंड,जवळगा पोमादेवी,किल्लारी,आलमला,भादा,उजनी,अशिव हा सलगन,नागरसोगा इत्यादी गावातही श्रीराम भक्तांनी या उत्सवात अत्यंत हर्ष उल्हास आणि सहभाग घेतला गुलाल उधळण झाल्यानंतर रामभक्तांना पावसाळयातील मंदिरामध्ये महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती सायंकाळी सहा वाजता शेकडो महिलांनी दीपोत्सव साजरा केला तसेच श्रीराम जन्मोत्सव सोहळा संयोजन समितीच्या वतीने प्रभू रामचंद्राच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा अवस्था शहरातील मुख्य रस्त्यावरून काढण्यात आली या शोभायात्रेत रामभक्त आणि श्रीराम जय राम जय जय राम चा जयघोष केल्यामुळे परिसर दुमदुमून गेला होता रात्री नऊ वाजता दक्षिण मुखी वीर हनुमान मंदिर चौकात फटाक्यांची आतिषबाजी व शोभेची दारू उडवून रामभक्तांनी जल्लोष साजरा केला.

# डीजेला ठाम नकार; ढोल ताशांचा गजरात गडचांदूर दणाणला;युवा शक्तीचा जल्लोष

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । सिध्देश्वर केंद्रे**

गडचांदूर येथील वार्ड क्रमांक ४ मध्ये रामनवमी जन्मोत्सव यंदा अत्यंत उत्साहात, जोशात आणि पारंपरिक जल्लोषात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे, नवयुगातील युवा पिढीने डीजे संस्कृतीला ठाम नकार देत ढोल-ताशांच्या दमदार गजरात उत्सव साजरा करून एक वेगळाच आदर्श निर्माण केला.ढोल-ताशांच्या कडकडाटाने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. आक्रमक आणि जोशपूर्ण तालावर युवक-युवती अक्षरशः रंगून गेले होते. या मिरवणुकीत महिला व पुरुष दोघांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत ढोल-ताशे वाजवत आकर्षक मिरवणूक काढली. पारंपरिक वाद्यांच्या गजरामुळे वातावरणात धार्मिकता आणि सांस्कृतिक ऊर्जा निर्माण झाली होती.



या उपक्रमामुळे केवळ सण साजरा झाला नाही, तर समाजात पारंपरिकतेबद्दल जागरूकता आणि एकजूटही दिसून आली. डीजेच्या कर्णकर्कश आवाजापेक्षा ढोल-ताशांचा गजर अधिक प्रभावी आणि सुसंस्कृत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

या यशस्वी आयोजनासाठी श्री रामनवमी उत्सव समिती, वार्ड क्र. ४ गडचांदूर यांनी विशेष पुढाकार घेतला. आयोजन समितीतील कैलाश कंठाळे, शुभम भोंगळे, महादेव बोरकर, राकेश श्रीमंगल, राधेश्याम चुट्टे, आदित्य तिवाडे, रोहित हंसकर, बंट्टी भोंगळे, कृष्णा मुनेश्वर, रवि गिरटकर तसेच वार्डमधील सर्व युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रम शांततेत आणि उत्साहात पार पाडला.एकूणच, वार्ड क्रमांक ४ मधील हा रामनवमी उत्सव पारंपरिकता, एकजूट आणि युवा शक्तीचे प्रेरणादायी उदाहरण ठरला.

# सम्राट अशोकांचा खरा इतिहास समाजा पुढे मांडणे काळाची गरज: हरी मेश्राम

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पळसगांव (पि) । शुभम गजभिये**



सम्राट अशोकांचे मूळ पुरुष हे जन्माने बौद्ध होते.त्यामुळे सम्राट अशोक हा जन्मत:च बौद्ध राजा होता,पण इथल्या इतिहासकारांनी खोटी माहिती सांगून कलिंग युद्धा नंतर सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारला असं सांगण्यात आलं. परंतु तत्कालीन इतिहासकाराने सम्राट अशोकांना क्रूर राजकर्ता ठरवले.मात्र इंग्रज संशोधकांनी सम्राट अशोक यांच्या शिलालेखांचा अभ्यास करून सम्राट अशोक असे समाजाभिमुख राजे होते,त्यांनी लोक कल्याणाच्या योजना राबवित आपल्या धर्माबरोबर

इतर धर्माचा आपण आदर केला पाहिजे अशी भावना सम्राट अशोक यांची होती.याबाबत इंग्रज संशोधकांनी शिलालेखाच्या माध्यमातून समोर आणले असे प्रतिपादन आंबेडकरी विचारवंत हरी मेश्राम सर यांनी केले.महाबोधी महाविहार समन्वय समिती तालुका चिमूर व समता सैनिक दल तालुका चिमूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती येथे अखंड भारताचे निर्माता सम्राट अशोक जयंती कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाबोधी महाविहार समन्वय समिती चिमूर तालुकाध्यक्ष विलास राऊत होते तर प्रमुख अतिथी म्हणून आंबेडकरी विचारवंत हरी मेश्राम,सामाजिक कार्यकर्ते डॉ.आशिष पाटील,डॉ.महेश खानेकर सर,आयु. सुरक्षाताई अंबादे धम्मांजली महिला मंडळ अध्यक्ष,तक्षशिला बुद्धविहाराचे अध्यक्ष वतन सहारे, धम्मपाल नरवडे एसबीआय चिमूर शाखा व्यवस्थापक आदी उपस्थित होते. चिमूर शहरांमध्ये दुसऱ्यांदा चक्रवती सम्राट अशोक यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला माता रमाबाई भीमरावजी आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाइन परीक्षेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रथम क्रमांक १००० मार्शल निशा प्रकाशनाथ पाटील,द्वितीय क्रमांक ७००,मार्शल शाश्वत रूपचंद पाटील,तृतीय क्रमांक ५०० मार्शल द्रुष्टी विलास राऊत यांना देण्यात आले.याचबरोबर सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहन प्रमाणपत्र वितरण (रोख रक्कम, प्रशस्तीपत्र,शिल्ड,भारत राष्ट्र कॅलेंडर) करण्यात आले. हरी मेश्राम पुढे म्हणाले की ज्या सम्राट अशोकांनी बंगाल पासून अफगाणिस्तान पर्यंत राज्य विस्तार केला त्याच सम्राट अशोकाला आज शासन विसरल्याचे दिसून येत आहे.सम्राट अशोकाच्या राज्यकारभाराच्या अनेक बाबीचा भारत देशाने स्वीकार केला. त्यांनी कोरलेले अशोक चक्र भारत देशांनी आपल्या ध्वजावर स्वीकारले,चार सिंहाची प्रतिमा सारनाथच्या स्तुपावरून सरकारने स्वीकारली.एवढे सारे असताना आज मात्र सम्राट अशोकांना देश विसरला त्यांचे कर्तृत्व देश विसरून गेला,याबाबत त्यांनी खेद व्यक्त केला.याप्रसंगी विलास राऊत,डॉ.आशिष पाटील,डॉ.महेश खानेकर, आयुष्यमती सुरक्षा अंबादे, धम्मपाल नरवडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रकाश मेश्राम यांनी केले तर प्रास्ताविक महेंद्र बारसागडे यांनी केले.आभार प्रियानंद गेडाम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धम्मांजली महिला मंडळ,महाबोधी महाविहार समन्वय समिती तालुका चिमूर,समता सैनिक दल चिमूर यांनी सहकार्य केले.

# पशुसंवर्धन विभागाकडून पशुधन पर्यवेक्षक च्या केडर वरती जाणीवपूर्वक अन्याय

## विद्यार्थ्यांनी दिला उपोषणाचा इशारा; जाहिरात १ महिन्याच्या आत प्रसिद्ध करण्याची केली विनंती

## आमच्या कडे ठोस पुरावे;विभाग विद्यार्थ्यांच्या रडारवर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । ज्ञानेश्वर जगताप**

चुका अधिकारी वर्गाच्या नुकसान सामान्य शेतकरी आणि विद्यार्थ्यांचे जाणीव पूर्वक केलेला अन्याय कधीच सहन नाही करणार

आपला विभाग मुख्यत्वे ग्रामीण भागात काम करतो सामान्य शेतकऱ्यांना रात्री अपरात्री त्यांच्या शेताच्या बांधा पर्यंत जाऊन आपले लोक सेवा देतात म्हणजेच काय तर शेतकऱ्यांचे हित हाच आपला ध्यास...

परंतु सध्याचे चित्र वेगळे दिसत आहेत लाखो पशुधन उपचारा अभावी त्यांना योग्य वेळी योग्य सेवा न मिळाल्याने मृत्यू पडत आहेत त्याचबरोबर लंपी किंवा लाळ्या खुरकत या सारख्या प्रमुख रोगांनी थैमान घातले आहे आणि त्यामुळे जगाचा पोशिंदा शेतकरी लाखो रुपयांच्या नुकसानाला सामोरे जात आहे

अश्यातच पशुसंवर्धन विभागामध्ये असलेले कमी मनुष्यबळ याकरिता पदभरती होणे गरजेचे आहे त्या संदर्भात साधारण पने

आम्ही आता पर्यंत ५० च्या वरती निवेदने दिली आहेत २६६ पदांची फाईल ( क्रमांक १४१०६२५). २०२४ पासून आपला विभाग काम करत आहे असे आम्हाला सांगण्यात येत होते

नोव्हेंबर २०२५ च्या दरम्यान आपण सामान्य प्रशासन विभाग यांचेकडून पदभरती साठी परवानगी मागितली होती आणि त्यांनी ४-५ डिसेंबर २०२५ च्या दरम्यान दिली सुद्धा होती ( माहितीच्या अधिकार या पत्रातून सर्व माहिती ,फाईल आलेली गेलेली दिनांक सर्व गोष्टी स्पष्ट मिळाल्या आहेत)

परंतु आपल्या विभागाच्या निष्क्रीय आणि अस्पष्ट कारभारामुळे परवानगी मिळून सुद्धा पदभरती जाणीवपूर्वक जाहीर केली गेली नाही

त्यानंतर ३ फेब्रुवारी २०२६ रोजी

सदर फाईल पुन्हा सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे परवानगीसाठी पाठवली असून आता खाजगी कंपनी (खइझड) यांचेकडून पदभरतीसाठी परवानगी मिळणे कठीण असल्याचे सामान्य प्रशासन विभाग यांचेकडून




माहिती मिळत आहे .परवानगी मिळाले नंतर त्या संदर्भातल्या कंपनीशी सर्व काम १/२ तासाचे असल्याची सुद्धा माहिती मिळते

परंतु पशुसंवर्धन विभागाने चक्क २५ दिवसांच्या पेक्षा जास्त वेळ मिळून सुद्धा जाहिरात जाणीवपूर्वक प्रसिद्ध केली गेली नाही

महाराष्ट्रातील तमाम जनता पशुपालक आणि विद्यार्थी यांचेवर केलेला जाणीवपूर्वक अन्याय स्पष्ट झाला असून आज पासून एक एक महिन्याच्या आत जर २६६ पदांची जाहिरात प्रसिद्ध झाली नाही तर शेतकरी विद्यार्थी तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार विद्यार्थी संघटना आणि इतर बऱ्याच संघटना यांचेकडून मंत्रालयामध्ये उपोषण तसेच आत्मदहनाचा इशारा विद्यार्थी आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे

तसेच पशुसंवर्धन विभागा कडून २६६ च्या पदभरतीसाठी शक्य ते प्रयत्न करून जाहिरात प्रसिद्ध केली पाहिजे नसेल तर विभागाकडून अशा बऱ्याच गोष्टी मीडिया समोर आणल्या जातील पशुसंवर्धन मंत्री आणि त्यांची पूर्ण अधिकारी टीम मिडीया आणि विद्यार्थी यांच्या रडार वरती असल्याची त्यांनी माहिती दिली

पशुसंवर्धन विभागा कडून १ महिन्यात जाहिरात जर प्रसिद्ध झाली नाही तर त्यांना फार मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागेल अशा इशारा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष राहुल महामुनी यांनी आणि विद्यार्थी यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली

# परिस्थितीवर मात व कष्टाची साथ नी ओमकार पेटेकर झाला डॉक्टर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

माणिक नगर नायगाव येथील रहिवाशी डॉ.ओमकार बालाजीराव पेटेकर हा खतगाव सारख्या ग्रामीण भागातला जिद्दी मुलगा २०२० सालच्या कोरोना काळामध्ये जिद्दीने आणि अपार परिश्रम मेहनत घेऊन तो नीट मध्ये ६२० गुण मिळून पहिल्याच प्रयत्नात महाराष्ट्रात नावाजलेल्या सर जे.जे हॉस्पिटल मुंबई येथे वैद्यकीय शिक्षणासाठी तो प्रवेश मिळवला त्यानंतर त्यांनी यशस्वीरित्या वैद्यकीय प्रशिक्षण पूर्ण करून पेटेकर परिवारातला पहिला डॉक्टर होण्याचा मान मिळवला.ओमकार हा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा विद्यार्थी. गायन हा त्याचा आवडता छंद आणि बुद्धिबळ स्पर्धेमध्ये तो देशातून दुसरा क्रमांक घेऊन आपल्या बुद्धिमत्तेची चमक सर्वांनाच दाखवून दिला होता.त्याने आतापर्यंत अनेक तालुकास्तरीय,जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय पुरस्कारासह सुवर्णपदक मिळवला...



त्याच्या त्या यशाबद्दल माजी खासदार,माजी मंत्री, मा.भास्करराव्जी पाटील खतगावकर,मा.बालाजीराव पा.खतगावकर,बाळासाहेब पाटील खतगावकर डॉ.सौ.मीनलताई पाटील खतगावकर,रवी पाटील खतगावकर तो आदमपूर येथील मा.सरपंच,मार्केट कमिटी बिलोली चे संचालक तथा खरेदी विक्री संघाचे संचालक अंबादास शिनगारे यांचा भाचा तर ग्रामीण साहित्यिक बालाजी पेटेकर यांचा चिरंजीव सामाजिक, राजकीय,शैक्षणिक, साहित्यिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरा तर्फे अभिनंदन केले. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# साळींबा येथे जागतिक वन दिनानिमित्त वृक्षारोपण व जन जागृती कार्यक्रम संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**वडवणी । नारायण साळुजी जाधव**

जागतिक वन दिनानिमित्त साळींबा येथे वृक्षारोपण व जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात ग्रामपंचायत सरपंच,सदस्य,विविध मान्यवर, अधिकारी, व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

साळींबा ग्रामपंचायत अंतर्गत जागतिक वन दिनानिमित्त वृक्षारोपण व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी वृक्षारोपण करण्यात आले तसेच ग्रामस्थांना वृक्षारोपण करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला यावेळी




वनपरिक्षेत्र अधिकारी एस.डी. वायभासे, श्रीमती.डी आर शिंदे वनपाल वडवणी, एल जी वरवडे वनरक्षक वडवणी, मुंडे सा.व.म.वडवणी यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व, झाडांचे मानव जीवनातील योगदान आणि वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी वृक्ष लागवडीची गरज याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले . यावेळी या कार्यक्रमाला सरपंच दिनेश नाईकवाडे, युवा नेते ओमराजे जाधव, ग्रामपंचायत सदस्य रामप्रसाद चव्हाण, सदस्य आकाश कांबळे, सदस्य बाबासाहेब खाडे, बालासाहेब मायकर,यासह ग्रामस्थ ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# बेलकुंड येथे मोठ्या थाटामाटात रामनवमी उत्साहात साजरी

## भक्तिमय वातावरणात प्रभू श्रीरामाचा जय जयकार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**औसा । महेश कोळी**

चैत्र शुद्ध नवमी असल्याने बेलकुंड येथे राम मंदिरात रामजन्म उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला, राम मंदिरातून सकाळी नऊ च्या सुमारास फुले, गुलाला उधळून , टाळ मृदुंगाच्या गजरात रामनामाचा जयजयकार करीत गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. सकाळी अकराच्या सुमारास रामजन्माचे कीर्तन संपन्न होऊन दुपारी १२ वा सर्व भाविकानी राममूर्ती वर फुले, गुलाला उधळून , टाळ मृदुंगाच्या गजरात रामनामाचा जयजयकार ,फटके आतषबाजी करण्यात आली.भक्तिमय वातावरणात प्रभू श्रीरामाचा जय जयकार बेलकुंडला राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गावच्या बाजार पेठेतून मिरवणूक काढण्यात आली. भक्तिमय वातावरणात प्रभू श्रीरामाचा जय जयकार करण्यात आला. तसेच यावेळी भजनांचा कार्यक्रम पार पडला. या भजनांच्या तालावर भाविक तल्लीन होऊन ठेका धरला होता. यावेळी आरती आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी भजनी मंडळ महिला,रामभक्त , गावातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# श्री अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तीमय सांगता; काल्याचे कीर्तन उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागाव । विजय थोरात**

महागाव येथील जुने हनुमान मंदिरात गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सुरू झालेल्या श्री अखंड हरिनाम सप्ताहाची आज गुरुवार, दि. २६ रोजी भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. रामनवमी निमित्त आयोजित या सप्ताहात दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.सप्ताहाच्या समारोपप्रसंगी ह.भ.प. विष्णुदास महाराज वाशिमकर यांचे काल्याचे कीर्तन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. त्यांच्या प्रभावी कीर्तनातून उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या कार्यक्रमाला महिला, बालगोपाल, पुरुष मंडळी तसेच भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या



या सप्ताहात दररोज काकड आरती, कीर्तन व नित्य नियमांचे पालन करण्यात आले. या धार्मिक सोहळ्याला महागाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार धनराज निळे व महागाव तहसील कार्यालय चे तहसीलदार अभय म्हस्के साहेब उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला.भक्ती, नामस्मरण आणि सामूहिक साधनेचा सुंदर संगम असलेल्या या सप्ताहाची सांगता भक्तांच्या समाधानाने आणि आनंदमय वातावरणात पार पडली.

# उन्हाळ्यातील वाढत्या तापमानात आरोग्य सांभाळा,काळजी घ्या-डॉ.शरद कुमार तेलगाणे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । एल पी उगीले**

सध्या वातावरणातील होणाऱ्या बदलामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे.त्यामुळे हवामान खात्याच्या अंदाजानुसार मार्च महिन्यापासुनच आपण राज्यातील अनेक भागात तापमान वाढताना पाहत आहोत. सर्व साधारणपणे एखाद्या प्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ अंश सेल्शियसने जास्त असेल तर त्याला उष्णतेची लाट असे संबोधतात, किंवा सलग दोन दिवस एखाद्या भागात तापमान ४५ अंश सेल्शियस पेक्षा जास्त असेल तर त्याभागात उष्णतेची लाट आली असे म्हटले जाते. सर्वसाधारणपणे सन बर्न, उष्णतेमुळे स्नायुंना गोळे येणे, उष्णतेमुळे प्रचंड थकवा, उष्माघात यांसारखे प्रामुख्याने उष्णताविकार असून साधारण एप्रिल, मे या महिन्यात उष्माघाताचा प्रादुर्भाव होत असतो. यासाठी नागरिकांनी वेळीच खबरदारी घेणे गरजेचे आहे. असे विचार ओम हॉस्पिटल अँड मॅटरनिटी होमचे प्रमुख तथा प्रबोधनात्मक कीर्तनकार ह भ प डॉ. शरद कुमार तेलगाने यांनी व्यक्त केले आहेत.



**उष्माघातासाठी अती जोखमीचे घटक**

उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक,वृद्ध व्यक्ती व लहान मुले, गरोदर महिला,स्थूल व्यक्ती व पुरेशी झोप न झालेले व्यक्ती, मधुमेह, हदयविकार, दारूचे व्यसन असणारे लोक, घट्ट कपडे घातलेले लोक, निराश्रीत, घरदार नसलेले गरीब लोक, कारखान्यात बॉयलर जवळ काम करणारे लोक

अशा अति जोखमीच्या लोकांना उष्माघाताचा धोका असून विशेषतः त्यांनी उष्णतेच्या लाटेदरम्यान विशेष काळजी घेतली पाहीजे. उष्णतेमुळे होणारा शारीरिक त्रास किरकोळ स्वरूपाच्या किंवा गंभीर स्वरूपाचा असतो. अशी ही माहिती डॉ. शरद कुमार के गाने यांनी दिली आहे.

उष्णतेमुळे होणाऱ्या त्रासाची लक्षणे सांगताना ते पुढे म्हणाले की,किरकोळ त्रासात उष्णतेमुळे थकवा येणे, ताप येणे, शरीरावर रॉश उमटणे, हातापायाला गोळे येणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिसून येतात.

गंभीर त्रासात उष्माघात होऊन त्वचा गरम व कोरडी पडणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, नाडीचे ठोके वेगात व जोऱ्यात असणे, मानसिक बेचैनी व अस्वस्थता, बेशुध्द अवस्था अशा लक्षणासह मृत्यूही होऊ शकतो, त्याकरिता वेळीच नागरिकांनी दक्षता घेऊन कोणतेही लक्षण दिसून आले असता आपल्या फॅमिली डॉक्टरला भेटून घ्यावे.

या अनुषंगाने सर्वांनी प्रतिबंधात्मक उपाय अवलंब करावा. जसे की

पुरेसे पाणी प्या, प्रवासात पाणी सोबत ठेवा, हलक्या वजनाचे फिकट रंगाचे (पांढरे) सैलसर कपडे वापर. उन्हात चष्मा, छत्री, टोपी व पादत्राणे वापर. ओलसर पडदे (वाळ्याचे), पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा. शक्य असल्यास उन्हात जाण्यापुर्वी सनस्क्रिन क्रिम वापरा किंवा कोरफडीचा गर लावा. शरबत किंवा जलसंजीवनीचा वापर करा. उन्हाळ्यामध्ये कोणीही कष्टाची कामे उन्हात करू नका. शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाने टाळा. लहान मुलांना पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नका. गडद रंगाचे तंग कपडे वापरू नका. मद्यपान, चहा, कॉफी टाळा. खुप प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. उन्हाच्या काळात भर दुपारी स्वयंपाक करणे टाळा, स्वयंपाकघर हवेशीर ठेवा.

दुर्दैवाने उष्माघाताचा त्रास झाल्यास प्रथोमचार म्हणून रुग्णास वातानुकुलीत खोलीत ठेवावे, अथवा हवेशीर खोलीत ठेवावे. खोलीत पंखे, कुलर ठेवावे. रुग्णाचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रुग्णास थंड पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात. आईसप्याक लावावेत. रुग्णाला जवळच्या आरोग्य केंद्रात घेऊन जाणे कधीही चांगले.

शासकीय पातळीवर देखील या अनुषंगाने दक्षता घेण्यात आली आहे.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व इतर शासकीय दवाखान्यात उन्हाळाच्या पूर्वतयारी अनुषंगाने आरोग्य विभागामार्फत उष्माघात कक्ष स्थापना, मुबलक औषधी साठा उपलब्धता, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी प्रशिक्षण, आरोग्य शिक्षण, जनजागृती इत्यादी उपाययोजना करण्यात आलेल्या असून ग्रामीण आरोग्य यंत्रणा सतर्क व सज्ज ठेवण्यात आलेली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आगामी दिवसांमध्ये जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते, अशा परिस्थितीत विविध उष्णताविकार अथवा उष्माघात होऊ नये, यासांठी नागरिकांनी आता पासूनच सजग रहावे. व प्रतिबंधात्मक उपायावर अधिक भर द्यावा. तसेच उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार करून घ्यावे, असेही आवाहन डॉ. शरद कुमार तेलगाने यांनी केले आहे.

# पंढरपूर येथे शिक्षक परिषदेचा प्रशिक्षण वर्ग उत्साहात संपन्न

# शिक्षक पात्रता परीक्षेबाबत शासन लवकरच पुनर्विचार याचिका दाखल करणार-ना.पंकज भोयर

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**श्रीक्षेत्र पंढरपूर | प्रतिनिधी**

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्नित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक विभाग) यांचा दोन दिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग दि. २१ व २२ मार्च रोजी एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोर्टी (ता. पंढरपूर, जि. सोलापूर) येथे उत्साहात संपन्न झाला.

या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन शालेय शिक्षण, गृह व सहकार राज्यमंत्री मा. ना. पंकज भोयर यांनी आभासी पद्धतीने केले. राष्ट्रीय उपाध्यक्ष भिखाभाई पटेल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमास शेषाद्री अण्णा डांगे, डॉ. कैलास करांडे, डॉ. बी. पी. रोंगे, प्रा. डॉ. प्रदीप खेडकर, प्रा. डॉ. शेखर चंद्रात्रे व प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे उपस्थित होते. शासन शिक्षक पात्रता परीक्षा (ढएढ) बाबत लवकरच मा सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करणार असल्याचे आश्वासन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी प्रशिक्षण वर्गातील कार्यकर्त्यांशी संवाद साधताना दिले




महाराष्ट्रातील २० जिल्ह्यांतील सुमारे ३५० कार्यकर्त्यांनी या प्रशिक्षण वर्गात सहभाग नोंदवला. दोन दिवस चाललेल्या या प्रशिक्षण वर्गात एकूण सात सत्रांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये 'एनईपी २०२०', त्याची अंमलबजावणी व शिक्षकांची भूमिका, 'विमर्श', संघटन कार्य, तसेच '-ख आणि भविष्यातील शिक्षण' व 'पंच परिवर्तन दायित्व बोध' या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या सत्रांमध्ये शेषाद्री डांगे, सचिन लादे , भिखाभाई पटेल, संदीप सावेकर आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

शैक्षिक महासंघाचे राष्ट्रीय सचिव प्रा. डॉ. प्रदीप खेडकर यांनी समारोपप्रसंगी या प्रशिक्षण वर्गातून शिक्षक परिषदेच्या संघटनात्मक विस्तारात आमूलाग्र बदल घडून येईल, असा विश्वास व्यक्त केला. पंढरपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार समाधान आवताडे यांनी समारोप कार्यक्रमास उपस्थित राहून 'राष्ट्र प्रथम' या विचाराने कार्य करणाऱ्या शिक्षक परिषदेच्या कार्यास शुभेच्छा देत सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन दिले.

या प्रशिक्षण वर्गाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे, कार्यवाह पुरुषोत्तम काळे, कोषाध्यक्ष अविनाश तालापल्लीवार, संघटन मंत्री सुरेश दंडवते, प्रांत प्रवक्ते दत्तप्रसाद पांडागळे, कार्याध्यक्ष मच्छिंद्र गुरमे, रमेश क्षीरसागर, किरण कुंभार, सहकार्यवाह राकेश आव्हाड, किशोर पिसे, नितीन पवार, उपाध्यक्ष डॉ. अवधूत वानखेडे, महिला आघाडी प्रमुख वैशाली काकडे, सहप्रमुख सुरेखा ताजवे, मराठवाडा विभाग अध्यक्ष संजय कोठाळे, नाशिक विभाग अध्यक्ष रामकृष्ण बागल, नागपूर विभाग कार्यवाह विजय साळवे, डॉ. सचिन लादे , सुनील जगताप आबा देवकुळे व रामेश्वर कोरे यांनी परिश्रम घेतले. नांदेड जिल्ह्यातून सर्वात जास्त १३०कार्यकर्त्यांनी ह्या प्रशिक्षण वर्गात पूर्ण वेळ उपस्थिती दिली असून कार्यकर्त्यांना उत्साह व ऊर्जा प्राप्त झाली असून संघटनेची कार्यपद्धती, अनुशासन वैचारिक अधिष्ठान यावर विश्वास ठेवून अनेक संघटनांचे पदाधिकारी यांनी शिक्षक परिषदेत प्रवेश घेतला.बाबींचा जवळून परिचय झाल्याने संघटन वाढीसाठी निश्चित याचा उपयोग होणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष व्यंकट गंदपवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.या प्रशिक्षण शिबिरास विभागीय कार्याध्यक्ष बालाजी बामणे, विभागीय उपाध्यक्ष राजेंद्र पाटील माळेगावकर जिल्हा नेते अशोक पाटील बावणे, दिगंबर पाटील कुरे, संभाजी आलेवाड , शिक्षक परिषदेचे माध्यमिक जिल्हाध्यक्ष डॉ वैजनाथ हंगरगे, केंद्रप्रमुख जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव आचणे, जेष्ठ सल्लागार वैजनाथ भिसे , चंद्रकांत गोंड, ज्ञानेश्वर घोडके, पद्माकर कुलकर्णी ,जिल्हा कोषाध्यक्ष धोंडीबा पांडागळे, जिल्हा कार्यालयीन सचिव बळवंत मंगनाळे, जिल्हा प्रवक्ते रवि ढगे, जिल्हा संघटन मंत्री संतोष साखरे,संजय मोरे, जिल्हा वरिष्ठ कार्याध्यक्ष बालाजी पांपटवार, गंगाधर तोडे, सतिष पाटील सांगवीकर,अशोक पाटील सुकनुरकर शिवराज साधू,जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष मिथुन मंडल्लेवार, जिल्हा संपर्क प्रमुख विश्वनाथ पाटील, जिल्हा प्रसिद्ध प्रमुख महेश पाटील थडीसावळीकर, विठ्ठल मुखेडकर यासह असंख्य जिल्हा पदाधिकारी व तालुका अध्यक्ष उपस्थित होते.

# अकोला कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ व्यंकट मायंदे यांची उदगीर येथे भेट

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**उदगीर | एल पी उगीले**

अफार्म संस्थेचे अध्यक्ष तथा डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. व्यंकटराव मायंदे यांनी एचडीएफसी बँक अर्थसाहित व अफार्म संचलित उदगीर तालुक्यातील सर्वांगीण ग्रामीण विकास प्रकल्पास सदिच्छा भेट देऊन पाहणी केली. याप्रसंगी अफार्मचे कार्यकारी संचालक सुभाष तांबोळी आणि प्रकल्प संचालक सचिन पुणेकर हे देखील सोबत होते. सर्वांगीण ग्रामीण विकास प्रकल्पाची अंमलबजावणी उदगीर तालुक्यातील १५ गावात करण्यात येत आहे. डॉ. व्यंकटराव मायेंदे यांनी अफार्मचे कार्यकारी संचालक सुभाष तांबोळी व प्रकल्प संचालक सचिन पुणेकर यांच्यासह प्रकल्पातील सताळा आणि लोहारा गावात भेट देऊन प्रकल्पाच्या कामाची तपासणी केली. सताळा गावात जलसंवर्धनाची कामे, स्मार्ट शाळा व गाव विकास समितीची तपासणी करून गावकरी आणि शाळेतील विद्यार्थ्यांसोबत संवाद





साधला. तसेच लोहारा गावात बेनीनाथ शेतकरी उत्पादक कंपनी स्थापित डाळ मिल उद्योग, गांडूळ खत निर्मिती केंद्र व सेंद्रिय कीटकनाशक उत्पादक केंद्र येथे भेट देऊन कामाची पाहणी केली, आणि कंपनीचे संचालक मंडळ यांच्यासोबत संवाद साधून माहिती घेतली. तसेच प्रकल्पातील इतर उपक्रम, फळबागा, शेतकऱ्यांना अवजार वाटप, अवजार बँक या उपक्रमाची माहिती घेऊन प्रत्यक्ष पाहणी केली. सदर भेटीदरम्यान त्यांनी गाव विकास समिती, बेनीनाथ शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालक मंडळ, शाळेतील विद्यार्थी तसेच गावकरी आणि प्रकल्पातील टीम यांना योग्य ते मार्गदर्शन केले.

डॉ. वेंकटराव मायंदे यांनी हैदराबाद येथील इकरीसॅट येथे ३५ वर्ष कृषीशास्त्रज्ञ म्हणून काम केले आहे. त्यांच्या या कारकिर्दीत त्यांनी कृषी अवजार व डाळ मिल संबंधी अनेक शोध लावले आहेत.

सदर क्षेत्र भेट प्रकल्पाचे व्यवस्थापक श्री राजेंद्र इंगळे व प्रकल्प टीम यांच्या समन्वयातून सकारात्मक संवाद साधता आला. असे विचार बेनीनाथ शेतकरी उत्पादक कंपनीचे चेअरमन हंसराज मोमले यांनी व्यक्त केले आहेत.

# खुल्या बाटलीत पेट्रोल-डिझेल विक्रीस जिल्हाभर बंदी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचा कडक आदेश

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**बाळासाहेब खेडकर | पाथर्डी**

अहिल्यानगर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सार्वजनिक सुरक्षेला प्राधान्य देत पेट्रोल-डिझेल विक्रीबाबत महत्त्वपूर्ण व कडक आदेश जारी केला आहे. ज्वलनशील पदार्थांच्या मुक्त विक्रीमुळे अनुचित घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन पेट्रोलियम नियम २००२ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून हा आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला आहे. या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालक व मालकांनी पेट्रोल-डिझेलची विक्री केवळ वाहनांच्या इंधन टाकीतच करावी, तसेच कोणत्याही परिस्थितीत खुल्या कॅन, बाटल्या, डबे किंवा इतर कोणत्याही भांड्यात पेट्रोल-डिझेल देणे किंवा विक्री करणे पूर्णतः बंद करण्यात आले आहे. यासोबतच सर्व पेट्रोल पंप परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवणे बंधनकारक करण्यात आले असून, इंधन विक्रीची नोंद नियमित व पारदर्शक पद्धतीने ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती अथवा पेट्रोल पंप चालकांवर पेट्रोलियम नियम २००२ मधील नियम ११८ ते २०२, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत कडक दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिला आहे. या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच हिंदुस्थान पेट्रोलियम, इंडियन ऑईल आणि भारत पेट्रोलियम या कंपन्यांना आवश्यक कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये व कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, सर्व पेट्रोल पंप मालक, व्यवस्थापक तसेच नागरिकांनी आदेशाचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# तामसा येथे गोवा रजनीगंधा गुटखा विक्री राजरोस सुरू

## अन्न औषध प्रशासन विभागाचा कानाडोळा

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**हदगांव | चंद्रकांत भोरे**

हदगाव तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेला तामसा येथेज्ञअन्न औषध प्रशासन विभागाच्या मुखसंतीने रजनीगंधा, मुसाफिर,राज निवास गोवा हा गुटखा पुड्या राजरोसपणे विक्री आणि तस्करी सुरू असून गुटखा पुड्याच्या आहारी शालेय विद्यार्थी गुटखा खाण्याच्या आधीन जाऊन आपले आरोग्य बिघडवीत आहेत. तामसा येथील एक गुटखा किंग तस्कर आंध्र प्रदेशातून हिमायतनगर मार्गे गुटख्याच्या गाड्या आणून तामसा शहरात साठवणूक करून निवघा, हदगाव, तामसा, लोहा, उमरखेड या परिसरात तस्करी करीत असल्याचीही जनतेत चर्चा होत असून ह्या



विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी आणि नांदेड येथील अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी या बाबीकडे लक्ष केंद्रित करून तामसा येथील गुटखा तस्करा किंग तस्करास कायद्याने वाटणीवर आणून त्यांच्या मुसक्या आवळतील काय? तामसा येथील राजरोस गुटखा तस्करीमुळे अन्न वऔषध प्रशासन विभागाची कर्तव्य निष्क्रियता चव्हाट्यावर आली असल्याचे हदगाव तालुक्यातील आणि तामसा येथील जनतेत बोलल्या जात आहे.

# महावितरणमध्ये घोटाळ्यांचा महापूर!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**किनवट | शेख शौकत**

नांदेडच्या महावितरण विभागातील किनवट उपविभागात गेल्या दहा वर्षांपासून कंत्राटी कामगारांच्या जीवावर 'अर्थपूर्ण' माया जमवण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कामगारांच्या घामाची कमाई थेट अधिकारी आणि कंत्राटदारांच्या खिशात जात असल्याचा खळबळजनक आरोप करत, महाराष्ट्र राष्ट्र नवनिर्माण सेनेने या भ्रष्ट साखळीलाथेट मुंबईत जाऊन आव्हान दिले आहे. मनसेने सादर केलेल्या निवेदनानुसार, किनवटमधील कामगारांना त्यांच्या हक्काच्या पगारापासून वंचित ठेवून केवळ ८ ते १० हजार रुपये 'फोन पे 'द्वारे देऊन बोळवण केली जात आहे. उर्वरित पगार नेमका जातो कुठे? तर, हा पैसा अधीक्षक अभियंता, एचआर मॅनेजर आणि कंत्राटदारांच्या अभेद्य 'भ्रष्ट साखळीत' वाटला जात असल्याचा आरोप आहे. विशेषकिनवटच्या कंत्राटी कामगारांच्या पिळवणुकीचे प्रकरण थेट मुंबई दरबारी म्हणजे, कामगार किनवटमध्ये घाम गाळतात, पण त्यांचा पगार परळी, माजलगाव आणि पुण्यातल्या बँकांमध्ये 'लाटला' जात आहे. यावरून हा घोटाळा किती खोलवर पसरला आहे, याची प्रचिती येते. स्थानिक पातळीवरील उपअभियंता केंद्रे आणि कंत्राटदार यांच्यातील 'मैत्री' कामगारांसाठी काळ ठरत आहे. जुन्या आणि अनुभवी कामगारांना कोणतीही कारणे न देता घरचा रस्ता दाखवून, नवीन उमेदवारांकडून नोकरीच्या बदल्यात २० ते २५ हजार रुपयांची 'लाच' वसूल केली जात असल्याचे निवेदनात नमूद आहे. जो कामगार प्रत्यक्ष कामावर नाही, त्याच्या नावे पगार उचलणे आणि जोराबतोय त्याला वेठीस धरणे,

असा अजब कारभार येथे सुरू आहे. स्थानिक स्तरावर वारंवार निवेदने आणि आंदोलने करूनही वरिष्ठांकडून केवळ 'आश्वासनांची मलमपट्टी' करण्यात आली. अखेर, सहनशीलतेचा अंत झाल्याने मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन मोहरे यांनी थेट मुंबई गाठली आहे. महावितरणच्या व्यवस्थापकीय संचालकांकडे पुराव्यासह या गैरप्रकाराचा पाढा वाचण्यात आला आहे. आता मुंबईतील महाव्यवस्थापक या 'महा-घोटाळ्याची' दखल घेऊन कंत्राटी कामगारांना न्याय मिळवून देतात, की पुन्हा एकदा कागदी घोडे नाचवले जातात, याकडे संपूर्ण नांदेड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# नांदेडमध्ये इंधन वितरणासाठी नवीन मार्गदर्शक सूचना जारी जिल्हाधिकारी- राहुल कर्डिले

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**नांदेड | अनिल पाटील तेलंग**

जिल्ह्यात सध्या इंधनाचा कोणताही तुटवडा नसतानाही काही नागरिकांकडून घाबरून (पॅनिक) पेट्रोल-डिझेलची जादा खरेदी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे पेट्रोलपंपांवर अनावश्यक गर्दी वाढत असून काही ठिकाणी वादाच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा विभाग), नांदेड यांनी इंधन वितरणाबाबत महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, नागरिकांनी घाबरून इंधन साठवणूक करू नये. दुचाकी वाहनांसाठी विदाउट गिअर वाहनांना २०० रुपयांपर्यंत तर विद गिअर वाहनांना ३०० रुपयांपर्यंत इंधन देण्यात येणार आहे. तीनचाकी वाहनांसाठी ५०० रुपयांपर्यंत आणि चारचाकी वाहनांसाठी जास्तीत जास्त १५०० रुपयांपर्यंत इंधन देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मोठ्या वाहनांसाठी ५० लिटर आणि अवजड वाहनांसाठी १०० लिटरपर्यंत इंधन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तसेच, कोणत्याही परिस्थितीत प्लास्टिक बाटल्या, ड्रम किंवा कॅनमध्ये इंधन देऊ नये, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. पेट्रोलपंपांवर गर्दी वाढल्यास पोलिस प्रशासनाच्या मदतीने टोकन पद्धतीचा अवलंब करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. कायद्याचे उल्लंघन करून इंधनाचा काळाबाजार केल्यास संबंधितांवर पेट्रोलियम ॲक्ट १९३४ व अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.याशिवाय, अत्यावश्यक सेवांसाठी स्वतंत्र इमर्जन्सी लेन तयार करण्याचे निर्देश देण्यात आले असून त्यामध्ये रुग्णवाहिका, अग्निशमन दल, पोलीस वाहने, तसेच शासकीय व आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित वाहनांना प्राधान्याने इंधन दिले जाणार आहे.जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व पेट्रोलपंप चालकांनी या सूचनांचे काटेकोर पालन करावे तसेच नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करून पॅनिक खरेदी टाळावी, असे आवाहन केले आहे



# उमरी येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंडित दिनदयाळ उपाध्याय निवासी प्रशिक्षण शिबीर संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशनराव गायकवाड**

येथे दि २५ मार्च २६ रोजी दुपारी २ वाजता रोहिदास मंगल कार्यालयात भारतीय जनता पार्टी नांदेड ग्रामीण दक्षिण जिल्हा अंतर्गत ता उमरी येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय निवासी प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदरील प्रशिक्षण शिबीर पंडित दिनदयाळ उपाध्याय व इतर मान्यवर नेत्यांचे दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील सावंत यांनी सत्कार केला. प्रथम सत्र मा मारोतराव कवळे गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले तर नांदेड ग्रामीण दक्षिणचे जिल्हा सरचिटणीस माणिकराव लोहगावे यांनी मार्गदर्शन केले आहे. तर दुसऱ्या सत्रात माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले आहे तर नांदेड ग्रामीण दक्षिणचे जिल्हा सरचिटणीस



लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी मार्गदर्शन केले आहे.

सदरील प्रशिक्षण शिबीरांत भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य किशनदादा गायकवाड कुदळेकर, डॉ अमोल ढगे, बापुसाहेब पाटील कौडगावकर, इत्यादीची प्रमुख उपस्थितीत होती. या प्रशिक्षण उपक्रमांमध्ये माणिकराव लोहगावे व लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना पक्षांची विचारधारा, संघटनात्मक बांधणी, तसेच समाजाभिमुख कार्यपद्धती याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले आहे.

या निवासी प्रशिक्षणाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना संघटन मजबूत करण्यासाठी आणि केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदीजी व राज्यातील मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणाऱ्या जनकल्याणकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रेरित करण्यात आले.

उमरी येथे पार पडलेल्या प्रशिक्षण शिबीरांत भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या उपक्रमामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवी उर्जा व उत्साह निर्माण होऊन पक्षाच्या विचारांना अधिक बळ मिळणार आसल्यांचा विश्वास यावेळी व्यक्त केला.सदर निवासी प्रशिक्षणांचे आयोजन ग्रामीण उमरी तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील सावंत व शहर अध्यक्ष बालाजी पाटील ढगे यांनी यांनी उत्तमरित्या व यशस्वी केले आहे. याबद्दल त्यांचे मान्यवरांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

यावेळी नांदेड ग्रामीण दक्षिणचे जिल्हा सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड, माणिकराव लोहगावे, शेतकरी नेते उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य किशनदादा गायकवाड कुदळेकर, डॉ अमोल ढगे, बापुसाहेब पाटील कौडगावकर, सौ सायली संजय कुलकर्णी नगर सेविका, गंगाधर पाटील पुय्यड, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, बालाजी माचेवाड,सौ अर्चनाताई राठोड, राणीताई पोटेवाड, प्रणिता जोशी, मायाताई दवणे, अविनाश पाटील कदम, अनुसूचित मोर्चाचे तालुकाध्यक्ष रवींद्र गायकवाड कुदळेकर, सापते पाटील चिंचाळकर, सोनु वाघमारे, मंडळातील सर्व लोकप्रतिनिधी, बुथ प्रमुख, शक्ती प्रमुख, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ॲड.कैलास भालचंद्र म्हात्रे यांच्या प्रयत्नामुळे मौजे बोकडवीरा येथील जमीनीला मिळाला प्रति चौ.मी.१७२५ /- रू.भरघोस भाव

# भरघोस भाव मिळवून दिल्याबद्दल ॲड.कैलास भालचंद्र म्हात्रे यांचे शेतकऱ्यांनी मानले आभार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उरण । विठ्ठल ममताबादे**

सिडकोने २४/०९/१९८६ रोजी कवडीमोल भावाने उरण तालुक्यातील मौजे बोकडवीरा येथील जमीन संपादित केली होती.मात्र जमीन संपादन करतानाचा भाव, त्याचा मोबदला शेतकऱ्यांना मान्य नव्हता.त्यातील एक शेतकरी भालचंद्र म्हात्रे यांनी कायदेशीर लढा लढण्याचा निर्णय घेत उरण मधील वकील ड. कैलास भालचंद्र म्हात्रे(फुंडे )यांच्याशी संपर्क साधला.व पुढील लढा लढण्याची तयारी दर्शविली.ड. कैलास भालचंद्र म्हात्रे (फुंडे) यांची मा.आलिबाग कोर्टात उपजिल्हाधिकारी,मेट्रो सेंटर उरण यांच्या विरोधात वाढीव भावासाठी केस कामी वकील म्हणून नेमणूक केली होती.परंतु दोनच महिन्यापूर्वी मौजे बोकडवीरा येथील काही शेतकऱ्यांना मा.अलिबाग कोर्टाने फक्त ७००/- रू.प्रति.चौ.मी.एवढाच अत्यल्प भाव मिळाला तसा निकाल लागला होता तशी बातमी वृत्तपत्रात, पेपरमधे शेतकऱ्यांनी वाचली त्यामुळे शेतकरी निराश झाले होते.परंतु ड.कैलास भालचंद्र म्हात्रे यांनी आपले कौशल्य पणाला लावून कायद्याच्या चौकटीत दोनच महिन्यात शेतकऱ्याची मौजे बोकडवीरा जमीनीला दिनांक २४/०३/ २०२६ रोजी १७२५/- रू.प्रति.चौ.मी.असा भरघोस वाढीव भाव मिळवून दिला.तसा निकाल मा.अलिबाग कोर्टाने दिला. यामुळे शेतकऱ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. सर्व शेतकरी यांनी ड.कैलास भालचंद्र म्हात्रे.( फुंडे )यांचे जाहीर आभार व्यक्त केले.वकील कैलास भालचंद्र म्हात्रे यांनी अशाप्रकारच्या अनेक शेतकऱ्यांच्या केसेसमधे जास्तीत जास्त भाव मिळवून सिडकोकडून पैसे तत्काळ मिळवून शेतकऱ्यांना दिले आहेत म्हणूनच आमचा वकिलसाहेबांवर संपूर्ण विश्वास होता आणि आहे. ड. कैलास भालचंद्र म्हात्रे यांच्यामुळे आम्हाला न्याय मिळाला आहे असे मत प्रकल्पग्रस्त शेतकरी भालचंद्र लक्ष्मण म्हात्रे व ईतर शेतकरी यांनी व्यक्त केली आहे.ॲड कैलास म्हात्रे यांनी आजपर्यंत आपल्या वकिलीच्या माध्यमातून अनेकांना न्याय मिळवून दिला आहे. उरण मधील शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# पूर्ण दिवसभर एनर्जीने परि पूर्ण राहायचे असेल तर... आहारात या हाय कार्ब युक्त पदार्थांचा समावेश करा!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

निरोगी राहण्यासाठी शरीरात सर्व पोषक तत्वे असणे आवश्यक आहे. कार्बोहायड्रेट्स आपल्या शरीराला आवश्यक असलेल्या या आवश्यक घटकांपैकी एक आहे. कार्बचे सेवन केल्यानेच आपल्या शरीराला ऊर्जा मिळते, म्हणून दररोज त्याचे सेवन करणे खूप महत्वाचे आहे. अशावेळी तुम्ही तुमच्या आहारात काही हाय कार्ब युक्त पदार्थांचा समावेश करू शकता. शरीराला जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने, कॅल्शियम अशा अनेक पोषक घटकांची गरज असते. त्याचप्रमाणे आपल्या शरीरालाही कार्बोहायड्रेट्सची गरज असते. बऱ्याचदा जेव्हा लोक वजन कमी करण्याचा विचार करतात तेव्हा ते त्यांच्या आहारातून कार्ब(हाय कार्बफूड) पूर्णपणे काढून टाकतात, जे चुकीचे आहे. कार्बचे सेवन केल्यानेच आपल्या शरीराला ऊर्जा मिळते, म्हणून दररोज त्याचे सेवन करणे खूप महत्वाचे आहे.आज आम्ही तुम्हाला अशा पदार्थांबद्दल सांगत आहोत ज्यात चांगल्या प्रमाणात कार्ब असतात आणि जे तुमच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जातात.



तालुका प्रतिनिधी
डॉ.. भारत उद्धव राठोड कणकीकर
मो.८८८८०३७५२०

राजगिरा हा एक उच्च पौष्टिक आहार आहे. हे ग्लूटेन मुक्त आहे आणि शाकाहारी लोकांसाठी एक चांगला पर्यायआहे. गव्हाऐवजी त्याचा आहारात समावेश करता येतो. ओट्स खूप हेल्दी कार्बोहायड्रेट मानले जातात. ओट्समध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते, ज्यामुळे चयापचय वेगवान होते आणि पचन निरोगी राहते. याच्या सेवनाने रक्तातील साखरेची पातळीही नियंत्रणात राहते. याशिवाय कोलेस्टेरॉल कमी करण्यासही मदत होते, ज्यामुळे हृदयाशी संबंधित आजाराचा धोका कमी होतो. केळी देखील कार्बचा चांगला स्रोत आहे. यात पोटॅशियम, बी ६ आणिव्हिटॅमिन-.उ देखील असते. जे वजन कमी करण्यापासून ते रक्ताभिसरण सुधारण्यास मदत करतात. बकव्हीट ज्याला आपण बकव्हीटपीठ म्हणून ओळखतो तो कार्बचा चांगला स्रोत आहे. हे खाणे खूप आरोग्यदायी मानले जाते. बकव्हीटमध्ये मॅग्नेशियम, जीवनसत्त्व, लोह, फोलेट, कॅल्शियम, झिंक, मॅंगनीज, कॉपर इत्यादी अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. मक्का कार्ब आणि फायबरचा खूप चांगला स्रोत मानला जातो. याच्या सेवनाने वजन झपाट्याने कमी होण्यास मदत होते. विद्रव्य फायबरने समृद्ध कॉर्न शरीरातील बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करते, ज्यामुळे हार्ट अटॅकसारख्या समस्या उद्भवत नाहीत....

## नाशिक चा स्वंयघोषित भोंदुबाबा अशोक खरात याला रिपाई व बौ.पं.स.गट क्र २९ वतीने जोडोमारो आंदोलन



लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । सुरेश वाघमारे**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) मालाड विधानसभा च्या वतीने मालाड स्टेशन येथे नाशिक चा स्वंयघोषित भविष्यतंज्ञ म्हणुन शेकडो महिलांना आपले मुत्र प्राशन करायला लावणार भोंदूबाबा अशोक खरात याचा निषेध करत त्यांच्या प्रतिमेस जोडोमारो आंदोलन मालाड विधानसभा अध्यक्ष श्री.सुनिल गमरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.हरामखोर अशोक खरात यांच्यावर तातडीने खटला चालवुन त्यास फाशीची शिक्षा झाली पाहिजे.तसेच .ह्या प्रकरणात महिला आयोग च्या माजी.अध्यक्षा रुपाली चाकणकर हिच्या सह जे जे ह्या अमानविय कृत्यास जबाबदार असतिल त्यांच्यावर ही गुन्हा दाखल करुन ,त्यानाही कडक शिक्षा जन्मठेप किंवा मरेपर्यंत फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशी मागणी सरकार कडे करण्यात आली.लवकरच शाशन नाही झाले तर आंदोलन अजुन उग्र करु असे सांगण्यात आले.ह्या निषेध मोर्चात मालाड विधानसभा अध्यक्ष व बौद्धजन पंचायत गट क्र.२९चे विश्वस्त सुनिल गमरे सह रिपाई नेते प्रकाश बनसोडे, आयुष सिंग,सत्यदेव बाबु चव्हाण (वार्ड अध्यक्ष ३५),मालती कटाळे,अश्विनी गोसावी ,मिना कदम,बौ.पं.स.क्र.५९६ चे उपाध्यक्ष सुरेश कांबळे,मंगेश टोम्पे,सुर्यकांत कांबळे,मनिष कांबळे,अमित कांबळे,अजित गोधंळी,एम.मुरगेश,मनोहर पवार,पंकज जाधव,एम.मुकेश,राजेश कौंडर,ईत्यादी हजर होते.सर्व कार्यकर्त्यानी सुनिल गमरे आगे बढो हम तुम्हारे साथ है.च्या घोषणा देत निषेध मोर्चा संपवला.

## कन्हेरी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला सुरुवात

# भागवत कथाकार ह.भ.प महेश महाराज भांदर्गे महापुरकर यांच्या सुश्राव्य वाणीतुन संगीतमय भागवत कथेचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जीवन जाधव । औसा**

औसा तालुक्यातील कन्हेरी येथे गेल्या ३२ वर्षापासुन अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व भागवत कथा साजरा केला जातो ,कन्हेरी येथील सप्ताहात भक्तीमय वातावरणात प्रति पंढरपुर प्रमाने भाविकांची गर्दी होते व गावातील नवतरुण व नवयुवक सांप्रदायात यावे यासाठी सप्ताहात नामवंत किर्तनकारांच्या सुश्राव्य किर्तनाचे आयोजन करण्यात येते , या सात दिवसीय सप्ताहात आज व्यासपीठ व गाथा पुजन करुन मोठ्या जल्लोशात सुरुवात करण्यात आली पुढील सात दिवसात काकडा.ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ,भागवत कथा ,हरिपाठ हरिजागर व किर्तनाचे आयोजन केले आहे यावेळी भागवत कथाकार ह .भ .प महेश महाराज भांदरगे महापूरकर यांच्या सुश्राव्य



वाणीतुन भाविकांना भागवत कथा होणार आहे ,
ह .भ .प धनराज महाराज रोंगे रिंगणीकर,ह .भ .प कुलदीप महाराज शिउरकर ,
ह .भ .प अमोल महाराज गुट्टे ,
ह .भ .प नामदेव महाराज राऊत केजकर,ह .भ. प सतीश महाराज कदम भूम,
ह.भ.प गुरुवर्य सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर
ह .भ .प श्री संदिपान महाराज सुमठाणकर सह काल्याचे किर्तन ह भ प बाळकृष्ण महाराज काळे सुगावकर यांच्या वानितुन भाविकांना ऐकण्यास मीळणार आहे ,यावेळी सरपंच पुरुषोत्तम झीरमीरे ,उपसरपंच किशोर झीरमीरे ,,गौतम बोडके,आमोल पांचाळ ,उमेश बोडके,रमेश बोडके,धनराज झीरमीरे ,वसंत झीरमीरे ,प्रल्हाद झीरमीरे ,अशिश झीरमीरे ,पंडीत घोटाळे ,उद्धव घोटाळे ,बालाजी दळवे ,बालाजी पाटील ,कीशोर झीरमीरे ,अनिल पाटील ,बाडगीरे गुरुजी , व्यासपीठ अधिकारी दयानंद पाटील ,वसंत आळंगे,सह
जगदंब प्रतिष्ठान कन्हेरीचे नवयुवक व तरुण कार्यकर्ते ,भजनी मंडळ सह समस्थ कन्हेरी ग्रामस्थ उपस्थीत होते,

# आशेचा किरण! विधवा मातेच्या दोन मुलांसाठी 'बालसंगोपन योजने'चे दरवाजे उघडले ;युवा नेते कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या पुढाकारामुळे मिळाले आर्थिक साहाय्य

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर**

दुःखाच्या काळात कोणाच्या तरी मदतीचा हात मिळणे हे नशिबाचे काम असते. हरडफ गावातील ज्योत्स्ना कृष्णा सूर्यवंशी या विधवा माऊलीच्या आयुष्यात अशीच एक आनंदाची बातमी समोर आली आहे. आपल्या पतीच्या निधनानंतर दोन लहान मुलांचा सांभाळ करताना आर्थिक विवंचनेत असलेल्या या माऊलीला युवा नेते आणि युवा सेना मराठवाडा सचिव कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या तत्काळ पुढाकारामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.


ज्योत्स्ना सूर्यवंशी यांचे पती नुकतेच काळाच्या पडद्याआड गेले. मागे आयुष्य (वय १० वर्षे) आणि अनुप (वय ८ वर्षे) ही दोन लहान मुले. पतीच्या निधनानंतर कुटुंबाचा आर्थिक आधारच हरवल्याने ज्योत्स्ना यांच्यासमोर जगण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. शासनाच्या 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजने'त त्यांनी अर्ज केला होता, परंतु काही तांत्रिक त्रुटींमुळे तो लाभ अडकला होता.

कृष्णा पाटील आष्टीकर यांचा तत्काळ पुढाकार

ही बाब गावातील कार्यकर्त्यांनी युवा नेते कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी संवेदनशीलतेने प्रकरणाची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क साधला आणि अर्जातील त्रुटी दूर करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांचा पाठपुरावा अविनाश पाटील मोरे व इतर सहकाऱ्यांनी पूर्ण केला.

४२ हजारांची मदत खात्यावर जमा

या प्रयत्नांना यश आले असून, ज्योत्स्ना सूर्यवंशी यांच्या मुलांच्या खात्यात ४२ हजार रुपयांची रक्कम



जमा झाली आहे. यापुढे या दोन्ही मुलांना १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत दरमहा प्रत्येकी २२५० रुपये, म्हणजेच दोघांसाठी मिळून ४५०० रुपये दरमहा मिळणार आहेत. मुलांच्या शिक्षणाचा आणि उपजीविकेचा मोठा प्रश्न या निर्णयामुळे सुटला आहे.

गरजू कुटुंबांना आवाहान

या मदतीमुळे कृतज्ञ झालेल्या ज्योत्स्ना सूर्यवंशी यांनी कृष्णा पाटील आष्टीकर यांचे आभार मानले आहेत. कृष्णा पाटील यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले की, ज्या कुटुंबांतील पालकांचे छत्र हरपले आहे, अशा कुटुंबांनी शासनच्या बालसंगोपन योजनेचा लाभ नक्की घ्यावा. कोणालाही योजनेत तांत्रिक अडचण येत असल्यास त्यांनी शिवसेना संपर्क कार्यालय, हदगाव येथे अवश्य संपर्क साधावा.

खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या सेवाकार्याचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933